MHAU030096442026

**फौ.कि.अर्ज क्र. १४०१/२०२६**

**रितेश राजकूमार जैन वि. सरकार**

## निशाणी क्रमांक १ वरील आदेश

सदरचा अर्ज हा अर्जदार **रितेश राजकूमार जैन** यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे गोठवलेली रक्कम बंधपत्रावर परत मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांना मोबाईलवर टेलिग्राम उघडण्यासाठी एक मेसेज आला व पैशांची गुंतवणुक केल्यास पैसे वाढवूण मिळतील असे सांगितले त्यानंतर अर्जदार यांनी परत रिप्लाय दिला की, तुम्ही पाठविलेल्या जाहिरातीबद्दल इच्छुक आहे. त्यामुळे, त्यांनी लगेचच एक लिंक सेंड केली. त्यांनी ती लिंक ओपन केली व पैशांची गुंतवणुक केली परंतू त्याचा मोबदला मिळाला नाही. त्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, त्यांची कोणीतरी अज्ञान व्यक्तीने फसवणुक केली आहे.

३. ऑनलाइन फसवणुकीचा बळी असल्याचे लक्षात येताच, अर्जदाराने तात्काळ २३.०३.२०२६ रोजी छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथील सायबर पोलिस ठाण्यात औपचारिक तक्रार दाखल केली. अर्जदार यांनी सायबर गुन्हा शाखेला गुन्हा नोंदविल्यानंतर अर्जदार यांची एकूण रक्कम रुपये १,८२,४२३.२५/– (एक लाख बैंशी हजार चारशे तेवीस रुपये) गोठविण्यात आले.

४. अर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदाराची सदरची रक्कम ही बँकेत पडून आहे तसेच, अर्जदाराच्या उदनिर्वाह करीता सदरील रक्कमेची अत्यंत आवश्यकता आहे. अर्जदाराने त्याच्या कथनाच्या पृष्ठयार्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडलेले आहे. अर्जदाराने ऑनलाईन तक्रारीची प्रत, अर्जदार यांचे आधारकार्ड, ट्रान्सझेक्शन डिटेल, इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेल आहे. सदर कागदपत्रे असे दर्शवितात की, सदर रक्कम अर्जदाराच्या खात्यातुन कपात झालेली आहे.

०५. तपासी अंमलदार यांचे म्हणणे असे की,क्रि. एम.ए.नं. १४०१/२०२६ अन्वये

दाखल केले आहे. प्रस्तुत प्रकरणात संबंधाने अर्जदार यांनी NCCRP नॅशनल सायबर क्राईम रिपोटींग पोर्टल वर तक्रार दाखल केलेली असुन त्याचा ACK. NO. ३१९०३२६००६२१०६ असा आहे. सदर तक्रार पुढील चौकशी कामी पोलीस ठाणे सायबर येथे प्राप्त झाली होती. तक्रारदार खात्यातुन रु.३,१३,०००/– रुपये ची आर्थिक फसवणुक झाल्याचे सदर तक्रार दिली होती. तसेच NCCRP पोर्टल द्वारे अर्जदार यांची फसवणुक झालेली पैकी रक्कमे रु.१,८२,४२३.२५/– इतकी रक्कम बँक खात्यावर गोठवण्यात आल्याचे दिसुन येत आहे.

६. सदर पोर्टलवर तक्रारदार यांची एकूण रक्कम रु.१,८२,४२३.२५/– ही वरील बँकेच्या खातेवर होल्ड करण्यात आलेली आहे. तरी संबंधित तक्रारदार यांची ऑनलाईन आर्थीक फसवणूक झालेली रक्कम ही तक्रारदार यांचे अकाउंट नंबर वर वटतील अशा अटी व शर्तीसह आमची काही एक हरकत नाही. सदर रक्कम अर्जदाराच्या खात्यावर परत करण्यास विद्वान सरकारी वकील यांनी हरकत घेतली आहे. प्रस्तुतची फिर्याद अर्जदारानेच दिलेली आहे. सदर मुद्देमालाचे स्वरुप पाहता ती रोख रक्कम असुन ती संबंधित बँकेत होल्ड आहे. अर्जदार यांच्या खात्यातुन सदर रक्कम हस्तांतरीत झालेली आहे. त्यामुळे अर्जदारावर योग्य त्या अटी व शर्ती लादून जर सदरची रक्कम सुपूर्तनामा बंधपत्रावर परत दिली तर ते न्यायाच्या हितार्थ होईल आणि म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

(१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

(२) जवाहर नगर पोलिस ठाणे, सायबर क्राइम, औरंगाबाद यांच्याकडे दाखल NCCRP पोर्टलद्वारे ACK. NO. ३१९०३२६००६२१०६ मधील रक्कम रुपये १,८२,४२३.२५/– ही रक्कम विविध खात्यावर होल्ड करण्यात आलेली आहे. सदर रक्कम रुपये १,८२,४२३.२५/– रुपये अर्जदारास खाते क्र.६२१७३८५०३०२ स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा लासूर स्टेशन, माऊंट कॉम्लेक्स, औरंगाबाद मध्ये रु.१,८२,४२३.२५/– सुपूर्तनामा बंधपत्र दिल्यानंतर त्यास परत करण्यात यावी.

(३) ज्यावेळेस मुद्देमाल हजर ठेवण्याचे आदेश करण्यात येतील त्यावेळेस अर्जदाराने

विनाविलंब तो न्यायालयात हजर करावा.

(४) सदर आदेशाची प्रत, सुपूर्तनामा व छायाचित्रे या गुन्हयाच्या कागदपत्रांमध्ये अथवा दोषारोपपत्र दाखल झाले असल्यास त्यामध्ये जतन करुन ठेवण्यात यावीत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRITI ASHOK SHRIRAM
Date: 2026.08.01 17:35:51 +0530

दिनांकः- ०१/०८/२०२६ (डॉ. प्रीती श्रीराम)

ठीकाणः–औरंगाबाद प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र. १२), औरंगाबाद.